चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, चंद्रपूर.
१९ मे, २०२०
☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

# रामनगर पोलीसांकडुन जबरी चोरी आणि घरफोडीचे गुन्हे उघड

## ३ दुचाकी आणि मोबाईलसह १ लक्ष ८१ हजार ५०० रू चा मुद्देमाल जप्त

दिनांक १८/०५/२०२० रोजी फिर्यादी नामे राजेश नारायण पोलेवार वय ३८ रा. सरकारनगर, चंद्रपुर हे रात्रो ०९ वाजताच्या सुमारास घराजवळ फोनवर बोलत असतांना एका दुचाकीवर तिन इसम येवुन त्यांचे हातातील ॲपल ११ प्रोमॅक्स कंपनीचा मोबाईल किं. ७०,०००/—रू जबरीने हिसकावुन नेला. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामनगर येथे अप.क्र. ४५१/२०२० कलम ३९२, ३४ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

गुन्हा नोंद होताच तपसास गुन्हे शोध पथकाद्वारे सुरूवात करण्यात आली. प्रकरणाचे घटनास्थळ गाठुन संशयीतांना तपासण्यात आले. दरम्यान गोपनीय माहिती मिळाली की, इंदीरानगर येथे एका मोबाईलबाबत तिन इसमांमध्ये वाद सुरू आहे. यावरून गुन्हे शोध पथकाने तात्काळ मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी पोहचुन काही तासातच सदर गुन्हयातील आरोपीतांना ताब्यात घेवुन त्यांना विचारपुस करून त्यांचे जवळुन गुन्हयातील चोरीचा ॲपल ११ प्रोमॅक्स मोबाईल फोन आणि गुन्हयात वापरलेली एक होंडा डिओ किं. ६५,०००/—रू **असा एकुण १,३५,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरच्या गुन्हयात आरोपी नामे करण जगदिश जाधव वय २१ रा. इंदीरानगर चंद्रपुर यास अटक करण्यात आली असुन इतर दोन हे विधिसंघर्ष बालक आहेत.

तसेच रामनगर पोलीसांनी पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्हयांपैकी तिन गुन्हे उघडकीस आणले आहे. ज्यामध्ये अप.क्र. ४०६/२०२० कलम ३७९ भादंवि मधील एक दुचाकी किं. २०,०००/—रू, अप.क्र.१७२/२०२० कलम ३७९,३४ भांदवि मधील एक दुचाकी किं. २५,०००/—रू, अप.क्र. ४४२/२०२० कलम ४५४,४५७,३८० भादंवि मधील १,५००/—रू असा एकुण तिन गुन्हयात **४६,०००/—रू** चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. वरील गुन्हयात एकुण चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक चंद्रपुर डॉ. महेश्वर रेड्डी व श्री. शिलवंत नांदेडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रपुर यांचे मार्गदर्शनामध्ये पोलीस स्टेशन रामनगर पोनि. श्री. हाके याचे नेतृत्वात पोउपनि संदीप कापडे यांचेसह सफौ. प्रभुदास माउलीकर, पोहवा. रजनिकांत पुठ्ठावार, आनंद परचाके, पुरूषोत्तम चिकाटे, पोशि. विकास जुमनाके यांनी महत्वपुर्ण कामगीरी बजाविली आहे.

———————————————————————————————————